# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
## (पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## अंतर्गत परिपत्रक

**विषय : विविध विभागांमध्ये टिपणीद्वारे/रिटेनरशिप तत्वावर हंगामी/कंत्राटी स्वरुपात करण्यात आलेल्या नियुक्त्यांबाबत.**

**संदर्भ :** १) परिपत्रक क्र.४५/२०१९ जावक क्र.एएन/१०६०, दिनांक २२.०३.२०१९
२) शासन निर्णय क्र.लोअप्र-२०१३/प्र.क्र.१६९/१३/विशि-१, दिनांक ०४.०९.२०१८
३) अंतर्गत परिपत्रक जावक क्र.एएन/१४३९, दिनांक १४/०५/२०२१

उपरोक्त संदर्भाकित परिपत्रक क्र.०३ यास अनुसरुन आपणास कळविण्यास येते की, विद्यापीठाच्या काही विभागांनी/कक्षांनी त्यांच्या स्तरावर कार्यालयीन कामकाजाची तातडीची निकड विचारात घेऊन विभागासाठी/कक्षासाठी उपलब्ध निधीतून तात्पुरत्या स्वरुपात कोणत्याही विहित प्रक्रियेचा अवलंब न करता नामनिर्देशनाद्वारे मनुष्यबळ उपलब्ध करुन घेतले आहे. सदर व्यक्तींचा विभागातील/कक्षातील कामकाजाचा कालावधी संपुष्टात आल्यानंतर देखील कोव्हीड १९ महामारीमुळे झालेल्या टाळेबंदीच्या कालावधीदरम्यान विद्यापीठाच्या प्रशासन शिक्षकेतर कक्षाने या व्यक्तीचा सहभाग सहानूभुतीपूर्वक विचार करुन सुरु ठेवला होता. विद्यापीठाच्या विविध विभागामध्ये/कक्षामध्ये अशा प्रकारे तात्पुरत्या स्वरुपात विहित कार्यपध्दतीचा अवलंब न करता विभागीय स्तरावर सहभागी करुन घेण्यात आलेल्या व्यक्तीच्या सेवेसंदर्भात विभागप्रमुख/शाखाप्रमुख यांनी निर्णय घेऊन संबंधितांना अवगत करण्याबाबत उपरोक्त नमूद अंतर्गत परिपत्रक जावक क्र.एएन/१४३९, दिनांक १४/०५/२०२१ नुसार कळविण्यात आले होते. त्याचप्रमाणे दिनांक ०१ जून, २०२१ पासून अशा व्यक्तीच्या सेवेच्या संदर्भात कोणतीही कार्यवाही प्रशासन शिक्षकेतर कक्षाकडून केली जाणार नाही व अशा व्यक्तीच्या संदर्भात उद्‌भवणाऱ्या प्रकरणामध्ये सर्व संबधित विभागप्रमुख/शाखाप्रमुख सर्वस्वी जबाबदार राहतील, असेही कळविण्यात आलेले होते.

विभागाने यापूर्वी केलेल्या कार्यवाहीनुसार सदर व्यक्तींच्या सहभागाची मुदत यापूर्वीच संपुष्टात आलेली असल्याने संदर्भीय परिपत्रकानुसार यापुढील कार्यवाही विभागीय स्तरावर न केल्यास अशा व्यक्तींचा यापुढील सहभाग व त्याअनुंषगाने त्यांच्या मानधनासंबंधी अडचणी उदभवू शकतात.

सबब, अंतर्गत परिपत्रक जावक क्र.एएन/१४३९, दिनांक १४/०५/२०२१ नुसार सदर व्यक्तींच्या सेवेच्या संदर्भात आपण केलेल्या कार्यवाहीचा सविस्तर अहवाल दिनांक २९ मे, २०२१ पूर्वी प्रशासन शिक्षकेतर कक्षास सादर करावा.

**(डॉ.प्रफुल्ल पवार)**
**कुलसचिव**

गणेशखिंड, पुणे ४११ ००७.
जावक क्र. एएन/ 1579
दिनाकं : २५/०५/२०२१

**प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी :-**
१. मा.विभागप्रमुख, सर्व शैक्षणिक विभाग
२. सर्व शाखाप्रमुख, सर्व प्रशासकीय विभाग